Research Papers

# भारतीय हस्तकला क्षेत्राची कामगिरी

महाजन संजय बाबूराव
कृष्णा कुटीर रु.नं.304, प्लॉट नं.135,
सेक्टर–1ई, कळंबोली कॉलनी,
कळंबोली, नवी मुंबई–410218.

प्रस्तावना :–

देशातील विविध हस्तव्यवसायांची परंपरा ही प्राचीन असून त्यात कलात्मकता, उपयुक्तता, सर्जनशीलता व उच्च मूल्ये यांचे मनमोहक असे मिश्रण आहे. धार्मिक श्रध्दा, चालीरिती, सामाजिक आचार–विचार, आर्थिक व्यवहार यांचे प्रतिबिंब हस्तव्यवसायावर पडल्याचे आढळून येते. भरतकाम, काष्ठशिल्प, वस्त्रकला, धातुकाम अशा अनेक पारंपारिक कलांचा उगम देशात पूर्वीपासून झालेला आढळतो. विशेशतः या सर्व हस्तव्यवसायांची निर्मिती व विस्तार याच भूमीतील साधने वापरून याच लोकांच्या भावभावना व्यक्त करण्यासाठी झाला. बनारसी व चंदेरी–साडया, कांजीवरम–सिल्क, काश्मीरी–शाली, सांगानेरी–प्रिंट्स, फिरोजाबादी–बांगडया, मुरादाबादी–भांडी, जोधपुरी व हैद्राबादी–फर्नीचर इत्यादी अनेक ब्रँड नावे आहेत की, ज्यांनी शताब्दिपासूनच भारतीय जनमानसात आपली ओळख निर्माण केली आहे.

या ब्रँडनावांचे वैशिष्टय म्हणजे यांची निर्मिती ही एखांदया नावलौकिक असणाऱ्या कंपनीकडून सुरूवात करून विज्ञापन व विपणन विशेषज्ञांकडून करण्यात आलेली नाही तर त्यांची ओळख व लोकप्रियता ही या उत्पादनांच्या निर्माण व विनिर्माणासाठी जोडलेल्या हस्तकलेच्या कारागिरांची कठोर मेहनत, सृजनात्मकता, कौशल्य व व्यवसायाप्रति असणारी निष्ठा यांचा एकत्रित परिणाम आहे. भारतीय हस्तकलेमध्ये पुष्कळशी वैविध्यता आहे. हस्तकारागीर हे संपूर्ण देशभर व विशेषतः ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात विखुरले आहेत. हस्तकलेस कुटीर उदयोग मानले जात आहे परंतु मागील काही वर्षांत हे क्षेत्र राजस्व मिळविण्याचे एक प्रमुख साधन बनले आहे. हस्तकला क्षेत्र हे सर्वाधिक सीमांत लोकांच्या ;डंतहपदंसप्रमकद्ध जीवनास स्पर्श करते. या क्षेत्रामध्ये पूर्वोत्तर, सीमावर्ती राज्ये, जम्मू–काश्मीर, ओसाड वस्तिस्थाने इत्यादीसारख्या कठीण श्रेणीच्या अर्थव्यवस्थेला रूपांतरित (Transform) करण्याची क्षमता (Potential) आहे. हे क्षेत्र उपयुक्त अशा सुती व जीवनशैलीस अनुसरून आवश्यक असणाऱ्या वस्तू श्रृंखलेचे उत्पादन करते. भारतीय अर्थव्यवस्थेत हस्तकला क्षेत्र हे प्रभावशाली व महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. हे क्षेत्र ग्रामीण व निमशहरी क्षेत्रात हस्तकारागिरांच्या एका बऱ्याच मोठया अशा समूहास रोजगारी उपलब्ध करून देते आणि सांस्कृतिक वारसांस जिवंत ठेवत असताणाच देशासाठी पर्याप्त विदेशी मुद्रा अर्जित करण्यात देखील विशेषत्वाने महत्वाचे आहे. हस्तकला क्षेत्रात विशाल अशी संभवनीयता आहे. कारण यामध्ये केवळ देशभरातील सर्व विभागात विखुरलेल्या वर्तमान कारागिरांना सामावून घेण्याची क्षमता आहे असे नव्हे तर, हस्तकला कार्यांत मोठया संख्येने प्रवेश करण्याची इच्छा असणाऱ्या नवीन कारागिरांना देखील सामावून घेण्याची देखील क्षमता आहे. सध्या या क्षेत्राचे रोजगारी, उत्पादन व निर्यातीत विशेष योगदान आहे. परंतु असंघटितपणा, शिक्षणाचा अभाव, अल्प भांडवल, नवीन तंत्रज्ञानाबाबतची अपर्याप्त माहिती, विपणनाबाबत अपूर्ण माहिती आणि अपर्याप्त संस्थात्मक चौकट इत्यादी अडथळयांच्यामुळे या क्षेत्रास हानी पोहोचली आहे5. प्रस्तुत लेखात भारतीय हस्तकला क्षेत्राचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### *हस्तकला क्षेत्राचा विस्तार :–*

हस्तकला व्यवसाय क्षेत्र हे भारतीय कानाकोपऱ्यात कोणत्या–ना–कोणत्या स्वरूपात विद्यमान राहिले आहे. स्थानीय पातळीवर कच्च्या मालाची व कारागिरांची उपलब्धता आणि राजे–महाराजे, नबाब–धनिकांच्या कालावधीत विविध प्रकारच्या कलांना देण्यात आलेल्या संरक्षणाने देशाच्या निरनिराळया विभागात वेगवेगळया प्रकारचे हस्तशिल्प/हस्तकला उदयोग स्थापन व विकसित झाले आहेत. परिवहन आणि माहितीची तीव्रगामी साधने विकसित झाल्याकारणाने हस्तशिल्प वस्तूंचा बाजार हा स्थानिय क्षेत्रापासून वाढून आंतरराष्ट्रीय बनला आहे. परंतु त्यांची उत्पादन केंद्रे ही अजूनही देशातील निरनिराळया राज्यांत केंद्रित झाली आहेत. हस्तकला वस्तुंची गुणवत्ता व त्यामधील

**Please cite this Article as:** *महाजन संजय बाबूराव.*, *'भारतीय हस्तकला क्षेत्राची कामगिरी* : **Indian Streams Research Journal (March ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.II/March; 12pp.1-4

वर्तमान कला–कौशल्यांच्या सहाय्यानेच अनेक हस्तकला उत्पादनाची उत्पादन स्थळे ही त्यांची चिरस्याची ब्रॅड नावे बनली आहेत6. 10 व्या पंचवार्षिक योजना कालावधी दरम्यान हस्तकला उप–समूहांची कामगिरी खालील पत्रकात दर्शविली आहे.

पत्रक क्रमांक–1, 10 व्या पंचवार्षिक योजने दरम्यान हस्तकला क्षेत्राची कामगिरी

| तपशील | 2002-03 | 2003-04 | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | CAGR(%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) उत्पादन (को.रू.मध्ये) | 19,565 | 24,019 | 28,936 | 29,804 | 38,660 | 14.5% |
| २) रोजगारी (लाख व्यक्ति) | 60.16 | 61.96 | 63.81 | 65.72 | 67.69 | 2.3% |
| ३) निर्यात (कोटी रूपये) | 10,934 | 12,768 | 15,616 | 17,277 | 20,963 | 14.0% |

**Source : Eleventh Five Year Plan 2007-2012 Volume – III Page No.111**

सध्या हस्तकला क्षेत्राने 3ः दराने महत्वपूर्ण वार्षिक वृध्दी साध्य केली आहे आणि 11 व्या पंचवार्षिक योजनेदरम्यान हस्तकला क्षेत्राच्या विकासासाठी महत्वपूर्ण मुद्दयांवर प्रयत्नांना श्रेष्ठतर बनविले जात आहे. उदा. (i) उत्पादन व निर्यातीसाठी आधारभूत सहाय्यता उपलब्ध करून देणे. (ii) पणधारक व उपभोक्ते या दोन्हींसाठी आणखीन अधिक जागरूकतेसहित गुणवत्ता व उत्पादन विविधीकरणात सुधारणा आणि (iii) क्रियान्वयनकारी अभिकरणाच्या स्वरूपात अशासकीय संघटनांसाठी एक महत्वपूर्ण भूमिका व मानवी आणि वित्त अशा दोन्ही स्वरूपात खाजगी संसाधनांची भागिदारी. हस्तशिल्प क्षेत्रामधील 3ः ची वार्षिक वृध्दी लक्षात घेता असा अंदाज आहे की, 10 व्या योजनेच्या शेवटीपर्यंत या क्षेत्रातील एकुण रोजगारी ही 67.70 लाखापर्यंत पोहोचेल की, जी 10 व्या योजनेच्या सुरूवातीस 60.16 लाख होती. ही बाब जवळपास 3ः  चा वार्षिक वृध्दी दर दर्शविते. या क्षेत्रातील या वृध्दीदराच्या दृष्टीक्षेपावरून असा अंदाज व्यक्त करण्यात येतो की, 11 व्या पंचवार्शिक योजनेच्या अखेरीस रोजगारी 80 लाखापर्यंत पोहोचली जाईल.

या कालावधी दरम्यान योजना खर्चात देखील सतत वृध्दी घडून आल्याचे दिसून येते. योजना खर्च सन 2002–03 मध्ये 71.65 कोटी रूपये होता तो वाढून सन 2010–11 मध्ये 286.00 कोटी रूपये असा राहिला सन 2002–03 पासून सन 2009–10 पर्यंतच्या दरम्यान उत्पादन 1956.52 कोटी रूपयांवरून वाढून 20,221.58 कोटी रूपये झाले. हस्तकला कार्यक्रम हा राज्याचा विषय असल्याकारणाने या क्षेत्राचा विकास व संवर्धन हे प्रत्येक राज्य सरकारचे प्रमुख उत्तरदायित्व आहे. तथापि केंद्र सरकारकडून विविध विकासात्मक योजनांच्या कार्यान्वयनाच्या माध्यमातून त्यांच्या प्रयत्नांना पूर्ण केले जात आहे.

***निर्यात उन्मुख उदयोग*** :– हस्तकला क्षेत्राचे स्वरूप सध्या हळू–हळू निर्यात–पूरक उदयोग असे बनत चालले आहे आणि हेच तत्व या क्षेत्राच्या विकासाची शक्ती आहे. याच कारणाने कारागिरांच्या विशेषतः बालश्रमिकांच्या शोषणास जन्म दिला आहे. जवळ–जवळ संपूर्ण देशभरात हस्तकला वस्तूंचे उत्पादन हे गावांत तसेच शहरांमध्ये विखुरलेल्या कारागिरांच्याद्वारे केले जात आहे. परंतु या उत्पादनाची विक्री ही स्थानीय स्तरावर आणि निर्यात ही जवळपास पूर्णतः खाजगी क्षेत्रातील व्यापारी वर्गाच्या हातामध्ये केंद्रित झाली आहे. सरकारी प्रयत्नांने कारागिरांच्या सहकारी समित्या आणि राज्य हस्तकला विकास निगमांची स्थापना देखील करण्यात आली आहे. परंतु कारागिर व हस्तशिल्प सहकारी समित्या आणि राज्य हस्तकला निगमाकडून प्रत्यक्षात निर्यातीची मात्रा ही नगण्य आहे. खाजगी उद्यमांकडून या क्षेत्रात मागणी निर्माण केली जाते की, जी विनिर्माण कार्यविधींना प्रोत्साहन देते.

देशातील सर्वच पर्यटन स्थळांवर मोठया संख्येने हस्तकला वस्तूंच्या व्यापारपेठा हया पर्यटकांना आकर्षित करतात. पर्यटक ग्राहकांना विशेषतः विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेकविध उचित–अनुचित पध्दतींचा अवलंब केला जातो. हस्त कारागिरांकडून 10 रूपयास खरेदी करण्यात आलेली वस्तू ही 1000 रूपयांस देखील विकली जाते आणि यामध्ये आश्चर्य असे काहीच नाही. मूल्यवर्धनाचे 990 रूपये हे दलाल, पर्यटकांना व्यापार पेठेपर्यंत घेऊन येणारे वाहन चालक, ट्रॅव्हल्स एजन्सीज व शो–रूमचे मालक यांच्यामध्ये विभागून घेतले जातात.

भारत सरकारद्वारे 1986–87 मध्ये जाहिर करण्यात आलेल्या आयात–निर्यात धोरणांतर्गत हस्तकला वस्तूंच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी निर्यात–प्रोत्साहन परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. या परिषदेच्या प्रयत्नाने भारतीय हस्तकला उत्पादनाची निर्यात ही सन 1990–91 मधील 713 कोटी रूपयांवरून वाढून 1992–93 मध्ये 1412 कोटी रूपये आणि 2001–02 मध्ये 6,769.50 कोटी रूपयांची झाली. सन 2003–04 या कालावधीत निर्यातीमध्ये सर्वाधिक वृध्दी ही एंब्रोइडरी व क्रोशियापासून बनविण्यात आलेल्या कपडयांची होती. या कालावधीत एकुण निर्यातीमध्ये या संवर्गातील उत्पादनांचा हिस्सा 29.70ः आहे. तर दुसऱ्या स्थानावर धातुच्या कलात्मक वस्तू आहेत की, ज्यांचे निर्यात मूल्य हे एकूण हस्तशिल्प निर्यात मूल्याच्या 25.95ः आहे. सन 1992–93 पासून 2002–03 पर्यंतच्या कालावधी दरम्यान लाकडी कलात्मक वस्तूंच्या निर्यातीचा वृध्दी दर 651.76ः, हाताने छापलेल्या वस्तूंचा निर्यात वृध्दीदर 646.32ः, जरीच्या वस्तूंचा निर्यात वृध्दीदर 273.90ः नकली आभूषणांचा 630.47ः आणि इतर हस्तकला उत्पादनांचा निर्यात वृध्दीदर 160.26ः राहिला आहे.

सध्य स्थितीत वैश्विक हस्तकला बाजाराची किंमत ही 400 बिलियन अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक राहिली आहे. यामध्ये चीनचा हिस्सा 30ः आणि भारताचा हिस्सा 2ः पेक्षाही कमी राहिला आहे. मागील 10 वर्षांत आपल्या हस्तकला निर्यात बाजाराचा सरासरी वार्षिक वृध्दी दर हा 15ः राहिला आहे. पुढील पाच वर्षांच्या दरम्यान यामध्ये 42ः ची वृध्दी प्रक्षेपित (Projected) करण्यात आली आहे आणि ती 9100 मिलियन अमेरिकन डॉलर्सची प्रभावी रक्कम उत्पन्न करेल. भारतीय हस्तशिल्पास पसंतीचे इष्टस्थळ (Destination) सयुंक्त अमेरिका राष्ट्र आहे. या राष्ट्राचा हिस्सा आपल्या एकुण निर्यातीच्या 29.59ः आहे. सन 2004–05 मध्ये युरोपला निर्यात 33.86ः होती. असे असूनदेखील लाकूडकाम, धातुकाम, गालिचा इत्यादीसारख्या काही कला समृध्द होत आहेत, दुसरे अडखळत राहिले आहेत. यद्यपि हस्तकला क्षेत्र निर्यात वृध्दीच्या दिशेने उन्नती करीत राहिले आहे परंतु हे क्षेत्र उत्पन्नातील प्रतिबध्द वृध्दीस साध्य करू शकले नाही. Rajsamund-Silver Minakari, Bhopal-Zari Work, Bhadoni-Carpets, Indore-Sequins and embroidery यासारख्या ठिकाणी मागील दोन वर्षात वेतनात परिवर्तन घडून आले नाही. जरी (Zari)] jRus (Gems) आणि दागिने (Jewellery) यांच्या एककांत आपल्या निपुण अंगुलींच्या कारणाने नेहमीच महिला व बालकांची नियुक्ती करण्यात येते. कामाची स्थिती अन्याय्य आहे आणि कामगार केवळ 10–15 रूपये प्रतिदिन वेतन कमावितात. नफा दलाल किंवा निर्यात गृहांच्याद्वारे घेतला जातो. हातमागाप्रमाणेच कारागिरीच्या (Crafts) बाबतीत देखील

Indian Streams Research Journal
Vol.2,Issue.II/March; 12pp.1-4

संपुर्ण देशात कोणताच डाटाबेस (Database) किंवा मापांकन (Mapping) नाही. सन 2010–11 च्या दरम्यान हाताने विणलेले गालिचे या सहित हस्तकला वस्तू निर्यातीचे लक्ष 12650 कोटी रूपयांचे निर्धारित करण्यात आले आहे. 2010–11 या वर्षीच्या दरम्यान (डिसेंबर 2010 पर्यंत) हस्तशिल्प व हस्तनिर्मित गालिचे व अन्य बसण्याच्या आच्छादनांची (Floor Coverings) निर्यात 9592.73 कोटी रूपयांची घडून आली आहे. हस्तशिल्प व हाताने विणलेले गालिचे (Handicrafts and carpet) या दोन्हींशी संबंधित निर्यातीची सविस्तर माहिती खालील पत्रकात दर्शविली आहे.

पत्रक क्रमांक–2, हस्तकलेची निर्यात (Export of Handicrafts – Rs. In Crores)

| Item | 2003-04 | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 | 2009-10 | 2010-11 (April–Dec.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) Carpet and other floor covering | 2779.79 | 2583.62 | 3082.06 | 3674.86 | 3524.73 | 2708.73 | 2505.33 | 2808.25 |
| (2) other Handicrafts | 13555.48 | 16984.14 | 16984.14 | 17288.14 | 14012.05 | 8183.12 | 8718.94 | 7284.48 |
| Grand Total (A+B) | 16335.27 | 18567.76 | 19267.65 | 20963.00 | 17536.78 | 10891.85 | 11224.27 | 9592.73 |

**Source : Annual Report 2010-11, Ministry of Textiles, Government of India Page No.160.**

हस्तकला क्षेत्रातील बाजारप्रेरित वृध्दीने भारतीय उत्पादनांना वैश्विक/जागतिक बाजार उपलब्ध झाला आहे. यामुळे शहरी क्षेत्रातील हस्तकला उत्पादनांपर्यंत विदेशी क्रेते पोहोचू शकले परंतु ग्रामीण कारागिरी वस्तूंपर्यंत त्यांची पोहोच मर्यादितच राहिली आहे. फिलीपाईन्स, चीन व तैवान यासारख्या देशातील सरकारे टोपली विणणे यासारख्या कमी खर्चातील कारागिरीला सुदृढ आधारभूत संरचना सहाय्यता उपलब्ध करून देतात परंतु भारतात अशा प्रकारच्या हस्तकलेला प्रोत्साहनाच्या हेतूने अध्यापपर्यंत काहीच करण्यात आलेले नाही. मागील काही वर्षांपासून हस्तकला निर्यात प्रोत्साहन परिषद, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाकडून वित्त पोषित गालिचे, वेत व बांबु उत्पादनांसाठीच्या योजना, इंडिया एक्सपोजीशन मार्ट आणि शहरी Haats स्थापन करून शहरी उत्पादकांच्याबरोबरच ग्रामीण हस्तकला उत्पादनांना देखील मुख्य प्रवाहात समाविष्ट केले जात आहे.

***हस्तकला क्षेत्राच्या विकासासाठी योजना/कार्यक्रम*** :– भारत सरकारने केंद्रिय स्तरावर देशात हस्तकला क्षेत्राच्या विकास व पूर्ण वृध्दीसाठी काही योजना सुरू केल्या आहेत. काही प्रमुख योजनांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे घेतला आहे.

(A) आंबेडकर हस्तशिल्प विकास योजना (Ambedkar Hastshilp Vikas Yojana- AHVY) :– सन 2001–02 दरम्यान पुढील उद्देशांच्या हेतूने आंबेडकर हस्तशिल्प विकास योजना सुरू करण्यात आली आहे.

(1) कारागिरांना विकास प्रक्रियेत सक्रिय उद्यमीसह–प्राथमिक हिस्सेदार बनविणे आणि देशीय व विदेशी बाजारांमध्ये सहजरित्या पोहोचण्यासाठी त्यांना एकदृश्य प्लॅटफॉर्मवर आणून समर्थ बनविणे

(2) मानवी संसाधन, उत्पादन, व्यवस्थापन उत्पन्नात इश्टतम विकासासाठी उत्पादन व विपणन प्रक्रियेत असणाऱ्या सर्व सदस्यांचा प्रभावीरित्या सामूहिक सहभाग

(3) कारागिरांचे समुदाय आधारित उदयोगांत संघटन उदा. स्वयंसहाय्यता समूह/सहकारी समित्या इत्यादी. या योजनेत हस्तकला क्षेत्राच्या सातत्यपूर्ण विकासासाठी कारागिरांच्या सहभागामार्फत योजनांच्या संबंधातील आवश्यकतांच्या आधारावर एकात्मिक दृष्टीकोण स्वीकारण्यात आला आहे. याद्वारे कारागिर सक्षम बनतील. या योजनेचे पुढीलप्रमाणे संघटक आहेत –

(I) सामाजिक मध्यस्थ

(ii) तंत्रज्ञान विषयक मध्यस्थ

(iii) विपणन मध्यस्थ

(iv) वित्तीय मध्यस्थ

(v) समूह विशिष्ट आधारभूत संरचनेसंबंधी मध्यस्थ. सन 2010–11 च्या दरम्यान (डिसेंबर 2010 पर्यंत) विविध मध्यस्थांच्यासाठी (Interventions) आणखीन 23,000 कारागिरांचा समावेश करण्यासाठी 100 स्वयंसहाय्यता समूह व 57 नवीन प्रकल्पांच्या कार्यान्वयनासाठी 37.70 कोटी रूपयांची धनराशी मंजूर करण्यात आली. सन 2010–11 (डिसेंबर 2010 पर्यंत) साठी कौशल्य विकास धारकाच्या अंतर्गत 98600 कारागिरांना कव्हर (Covered) करण्यात आले आहे. सन 2009–10 च्या दरम्यान 27644 कारागिर क्रेडिट कार्डस् (Artisans Credit Cards) जारी करण्यात आली होती की, जी 92.15 कोटी रूपयांच्या ऋण मंजूरीचे प्रतिनिधित्व करतात. सन 2010–11 (ऑक्टोंबर 2010) कालावधी दरम्यान 4144 जारी करण्यात आले आहेत की, जी 150.72 कोटी रूपयांच्या संचयी क्रेडिट (Cumulative Credit) मंजूरीचे प्रतिनिधित्व करतात10.

(B) डिझाइन्स व तंत्रज्ञान उन्नती योजना (Design and Technical Upgradation) :– या योजनेची उद्दीष्टये पुढील प्रमाणे आहेत

I) विदेशी बाजारांसाठी नवीन डिझाइन्स

ii) मूळ नमुना उत्पादनांच्या विकासमाध्यमातून कारागिरांच्या कौशल्याची उन्नती करणे

iii) लुप्त प्रायः शिल्पांचे पुनरूत्थान

iv) वारसांचे संरक्षण इत्यादी. या योजनेचे संघटक पुढीलप्रमाणे आहेत

I) कौशल उन्नती

ii) डिझाइन्स व तंत्रज्ञान उन्नतीसाठी मदत

iii) दुर्लभ व लुप्तप्रायः शिल्पांचे प्रलेखन, परिक्षण आणि पुनरूत्थान
iv) हस्तशिल्प क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी राष्ट्रीय पुरस्कार
v) राज्य पुढाकारा अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या संस्थासाठी वित्तीय सहाय्यता
vi) डिझाइन्स बँकेची स्थापना
vii) केंद्र सरकाराद्वारे प्रायोजित संस्थांना वित्तीय सहाय्यता
viii) निर्यातकांसाठी उत्पादन विकास कार्यक्रम.

सन 2010—11 च्या दरम्यान पूर्वोत्तर क्षेत्रासहित डिझाइन्स व तंत्रज्ञान उन्नती योजनेअंतर्गत 16.73 कोटी रूपयांचे आवंटन करण्यात आले आहे. या आवंटित धनराशीमधून 31 डिसेंबर 2010 पर्यंत विविध कार्यक्रम अर्थात 379 डिझाइन्स कार्यशाळा (नवीन / भरपाई), 43 एकात्मिक प्रकल्प (नवीन / भरपाई), 02 राज्य संचालित डिझाइन्स केंद्रे (दुसरा हप्ता), 10 पसच ळनतने (नवीन / भरपाई), एक डिझाइन्स बँक (दुसरा हप्ता), विभागीय डिझाइन्स आणि तंत्रज्ञान विकास केंद्रांच्या अंतर्गत विभागीय कार्यक्रम व प्रसिध्दीसाठी 12.36 कोटी रूपयांची धनराशी निर्मुक्त करण्यात आली आहे.

(C) विपणन सहाय्यता व सेवा योजना (Marketing Support and Services Schemes) :– दहाव्या योजना कालावधी दरम्यान निरनिराळया स्वरूपात चालविल्या जाणाऱ्या विपणन सहाय्यता योजना आणि निर्यात संवर्धन योजनांना एकत्रित करून 11 व्या पंचवार्शिक योजनेत 'विपणन सहाय्यता व सेवा योजना' असे नवीन नाव देण्यात आले आहे. या योजनेचे
I) देशीय विपणन
ii) आंतरराष्ट्रीय विपणन
iii) प्रसिध्दी हे प्रामुख्याने तीन घटक आहेत. सन 2010—11 च्या दरम्यान देशीय विपणन पूर्वोत्तर क्षेत्रासहित विपणन व सहाय्यता सेवा योजनेच्या अंतर्गत 75.00 कोटी रूपये आवंटित करण्यात आले आहेत. आवंटित 75.00 कोटी रूपयांमधील 31 डिसेंबर 2010 पर्यंत 36.87 कोटी रूपयांची धनराशी देशीय विपणनः मान्यताप्राप्त—311 कार्यक्रम, गांधी शिल्प बाजार, प्रदर्शने, सोर्सिंग—शो, शहरांत विपणन हब, व्यापारीपेठांचे नुतनीकरण, राज्य / स्थानीय विपणन कार्यशाळा, शाळांमध्ये जागरूकता शिबिरे आणि विविध क्षेत्रांद्वारे भाडे तत्वावर स्टॉल घेणे यासारख्या आयोजित 73 कार्यक्रमांसाठी मान्यता देण्यात आली आहे. याच्या अतिरिक्त 62 आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांना मान्यता आणि 46 आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत 11.

(D) मानवी संसाधन विकास योजना (Human Resource Development Scheme) :– या योजनेचे निरूपण वर्तमान बाजाराच्या आवश्यकतांना पूर्ण करण्यासाठी उपयुक्त तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि परिवर्तनशील डिझाइन्सचा अवलंब व गुणवत्तेमधील सुधारणे बरोबरच एक मजबूत उत्पादन आधार तयार करण्यासाठी अर्हताप्राप्त व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहे. सन 2010—22 च्या दरम्यान पूर्वोत्तर क्षेत्रासहित मानवी संसाधन विकास योजनेच्या अंतर्गत 19.34 कोटी रूपये आवंटित करण्यात आले आहेत. आवंटित 19.34 कोटी रूपयांमधील पाच संस्थागत प्रशिक्षण कार्यक्रम आणि शिष्य परंपरांच्या अंतर्गत 191 कार्यक्रम, 15 सेमिनार्स, 58 पॅटर्न बनविने, 303 क्षमता निर्माण यासारख्या कार्यक्रमांच्यासाठी 31 डिसेंबर 2010 पर्यंत 12.82 कोटी रूपयांची धनराशी मंजुर करण्यात आली आहे.

(E) संशोधन आणि विकास (Research and Development) :– या योजनेची सुरूवात हस्तकला क्षेत्रासमोरील समस्या व विशिष्ट पैलूंचे सखोल विश्लेषणासाठी आणखीन महत्वाच्या शिल्पांचे सर्वेक्षण व अध्ययन करण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. यामुळे धोरण आयोजनात उपयुक्त आदाने व चालू असणाऱ्या कार्यक्रमास प्रभावी बनविण्यात मदत मिळू शकते आणि या कार्यालयाद्वारे कार्यान्वित योजनांचे स्वतंत्ररित्या मूल्यांकन देखील केले जाऊ शकेल. या योजनेस 11 व्या पंचवार्षिक योजने दरम्यान कार्यान्वयनासाठी जारी ठेवण्यात आले असून या योजनेच्या माध्यमातून पुढील कार्यक्रम राबविले जात आहेत—
I) सर्वेक्षण व अध्ययन
ii) प्रतिवर्षी देशातील 20: जिल्हे या दराने हस्तकला कारागिरांची जनगणना आयोजित करणे
iii) कच्चा माल आणि उत्पादनांच्या प्रमाणीकरणासाठी Geographical Indication Act and Financial Support for Certification of raw Materials and Product.
iv) कच्च्या मालाचे मानकीकरण / प्रमाणीकरणासाठी नवीन प्रयोगशाळांची स्थापना / वर्तमान प्रयोगशाळांचे सुदृढीकरण
v) सामान्य उत्पादनासाठी हस्तशिल्प चिंन्हासहित बारकोडिंग आणि GSI जागतिक ओळख गुणवत्तेला स्वीकारण्यात हस्तशिल्प निर्यातकांना सहाय्य करणे. सन 2010—11 च्या दरम्यान पूर्वोत्तर क्षेत्रासहित संशोधन आणि विकास योजनेअंतर्गत 12.00 कोटी रूपये आवंटित करण्यात आले आहेत. या आवंटित 12.00 कोटी रूपयांमधून 12 अध्ययने, 204 सेमिनारांसहित कार्यशाळा, MHSC, मुरादाबाद सितापूर, जोधपूर, सहारनपुर (Saharanpur) व अगरतला येथील पाच प्रयोगशाळांशी जोडलेल्या कार्यक्रमांच्यासाठी 31 डिसेंबर 2010 पर्यंत 4.77 कोटी रूपयांची धनराशी मंजूर करण्यात आली आहे. संपूर्ण देशात हस्तशिल्प कारागिरांची जणगणना प्रगतीपथावर आहे. 11 वी पंचवार्शिक योजना समाप्तीपूर्वीच जणगणनेचे हे कार्य पूर्ण केले जाणे अपेक्षित आहे.

(F) हस्तशिल्प कारागिरांसाठीची सर्वसमावेशक कल्याण योजना (Handicrafts Artisans Comprehensive Welfare Schemes) :– या योजनेचा उद्देश हस्तशिल्प कारागिर व त्यांच्या कुटुंबास विम्याचे कव्हर (Cover) व आरोग्य देखभालीचा आहे. यासाठी 11 व्या पंचवार्षिक योजनेदरम्यान योजनेचा एक प्रमुख भाग या स्वरूपात कार्यान्वयनाच्या हेतूने राजीव गांधी शिल्पी आरोग्य विमा योजना व हस्तशिल्प कारागीर विमा योजना या दोन घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सन 2010—11 च्या दरम्यान पूर्वोत्तर क्षेत्रासहित हस्तशिल्प कारागिरांसाठीची सर्वसमावेशक कल्याण योजनेअंतर्गत 84.11 कोटी रूपयांची राशी आवंटित करण्यात आली आहे. परंतु कार्यान्वयनकारी एजन्सीजच्या नावावरील अनिशितता या कारणाने धनराशीस निर्मुक्त करण्यात आलेली नाही. कार्यान्वयनकारी एजन्सीज च्या निवडीसंबंधातील प्रक्रिया सुरु असून अंतिम टप्प्यात / चरणात आहे.

***हस्तकला क्षेत्रासमोरील आव्हाने*** (Challenges) :– हातमाग आणि हस्तशिल्प या दोहोंमधील तफावत ही खोटी (Artificial) आणि समजण्यास कठीण आहे. उदा. गालिचे (Carpets) हाताने विणलेले असतात परंतु त्यांचा अंतर्भाव हा हस्तशिल्पामध्ये केला जातो. ही तफावत कारागिरांच्या योजनांपर्यंतची पोहोच मर्यादित बनविते आणि अनेक बाबतीमध्ये याची परिणती पुनरावृत्तीत होते. कलम 5.22 ते 5.31

मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या सामान्य आव्हानांच्या व्यतिरिक्त हस्तशिल्पकारांच्या समोर येत असणारी हस्तशिल्प क्षेत्राची काही विशिष्ट आव्हाने आहेत.

1) तंत्रज्ञान उन्नती (Technology Upgradation) :– जुने आणि परंपरागत वापरले जाणारे तंत्रज्ञान हे काबाडकष्ट करणाऱ्यांचे वेतन वाढविते. कारागिरांच्या आरोग्यावर प्रभाव पडतो, उत्पादकता घटविते आणि अनेक बाबतीत गुणवत्तेवर देखील प्रभाव टाकत आहे.

(2) पर्यावरण आणि आरोग्यावर प्रभाव (Impact on Environment and Health) :– मुद्रण, धातुकाम रंगाचा वापर, लाकडीकाम ही कार्ये पर्यावरण व आरोग्यावर प्रभाव टाकतात. बहुतांश एकके ही घरामध्ये स्थित (home-based) किंवा लघुस्तरीय क्षमता असणारी आहेत. त्यांच्याकडे पर्याप्त सुरक्षा व्यवस्था आणि Sewage Treatment Facilitiè चा अभाव आहे. परिणामतः ही एकके बिगर–शुल्क बंधनात अडकतात. शिल्पकारांच्यासाठी व्यावसायिक आरोग्य आणि निस्त्रावाचा उपचार व प्रदूषण नियंत्रण यासाठी साधे, स्वस्त तंत्रज्ञान विकसित करण्याचे सुनिश्चित करणे हे आव्हान आहे.

(3) कारागिरांच्या हितांची सुरक्षा (Saffguarding the Interests of Artisans) :– हस्तशिल्प क्षेत्रात चालू असणारा वादविवाद (विशेषतः गालिचे विणकाम क्षेत्रात) हा श्रमविषयक कायदयांमध्ये आणखीन अधिक लवचिकता आणण्याच्या संदर्भात आहे जेणेकरून निर्यात गृहांच्या विस्तारास मान्यता दिली जाऊ शकेल. 11 व्या पंचवार्षिक योजनेचे आव्हान हे वास्तवतः उत्पादक कारागिर हितांचा उत्पादकतेच्या संबंधातील लाभांबरोबर समतोल साधला जाण्याचे आहे. एक आवर्ती सूचना अशी आहे की, जर राज्य सरकारे ही सामाजिक सुरक्षितता उपलब्ध करून देण्यास तयार असतील तर उदयोग संस्थांना काही प्रमाणात लवचिकतेस परवानगी दिली जाऊ शकते.

(4) गुणवत्ता नियंत्रण आणि प्रामाणीकरण (Quality Control and Standardization) :– प्रमाणीकरण प्रक्रियेचा अभाव, कच्च्या मालाच्या बाबतीत परिक्षण आणि प्रमाणित करण्याची अपर्याप्त सुविधा व निर्यात संभवनीयतेवरील उत्पादनाचा प्रभाव ही हस्तकला क्षेत्रासमोरील आव्हाने देखील महत्वाची आहेत की, ज्यांच्याकडे जाणीवपूर्वकरित्या लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अधिकांश संकुले ही एका बाजार–आधारित मूल्य श्रृंखलेमध्ये काम करीत आहेत. या ठिकाणी कारागिर व क्रेते हे दोन्ही उत्तम–चांगल्या संख्येने राहतात. क्रेते व कारागीरांमध्ये कोणताही वैयक्तिक संबंध असत नाही. काही बाबतीत तर कारागीर हे स्वतःच क्रेत्यांपासून दूर राहणे पसंत करतात. मागील काही दशकांपासून असेच हळुवारपणे चालत आहे. प्रथमतः यंत्रानी हाताने काम करणाऱ्या कारागिरांची जागा घेतली आणि बाजारामधील त्यांची संख्या कमी होत गेली. त्यांच्या बाजार हा शहरी केंद्रांमध्ये परावर्तीत झाला. याच्यानंतर दूरस्थ शहरी बाजारांच्या बदलत्या आवश्यकतांनी कारागिरांच्या पारंपारिक ज्ञानास अप्रासंगिक बनविले. परिणामतः या क्षेत्रात उच्च तंत्रज्ञान असणाऱ्या शिल्प उत्पादनांच्या नियंत्रकांचा व व्यवस्थापकांचा स्वाभाविकपणे उगम घडून आला. यामधील अधिकांश नियंत्रक व व्यवस्थापक हे शहरांमध्ये राहत होते. त्यांनी शिल्पकारांना समसामायिक बाजाराची नवीन समज करुन दिली आणि बाजार देखील उपलब्ध करुन दिला. अशाप्रकारे हळूवारपणे शिल्पकार हे आपल्या ग्रामीण ठेव्यापासून दूर होत गेले, पारंपारिक बाजार समज बाबतीत त्यांची जी लाभप्रद स्थिती होती, ती देखील हळू–हळू पुरवठादारांच्या हातामधील माहोर बनून राहिली आणि ते शिल्प उत्पादनाचे स्वस्तातील श्रमिक बनले.

पुढील मार्ग (The Way Forward):– 11 व्या पंचवार्षिक योजनेच्या दरम्यान हस्तकला उत्पादनांना दुप्पटीपेक्षाही अधिक दराने वाढविणे (सन 2007–08 मधील 43,600 कोटी रुपयांवरुन 2011–12 मध्ये 90,412 कोटी रुपये), निर्यात दुप्पटीने (सन 2007–08 मधील 23,400 कोटी रुपयांवरुन 2011–12 मध्ये 48,522 कोटी रुपये) वाढविणे आणि जवळपास 11 लाख अतिरिक्त नोकऱ्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. पूर्वोत्तर क्षेत्रासाठी 500 कोटी रुपयांचा निर्यात कारभार आणि 150 कोटी रुपयांचा ऋण प्रवाह निर्धारत करण्यात आला आहे. यासाठी आधारभूत संरचना महत्वाची आहे. सरकारी संसाधनांच्या संवर्धनासाठी सार्वजनिक व खाजगी भागिदारीच्या आधारावर योजनांचा स्वीकार करण्यात येणार आहे. योजना व धोरणांच्या प्रभावी कार्यान्वयनास सुनिश्चित करण्यासाठी आणि शिल्पकारांचा परिशुध्द डाटाबेस संग्रहित करण्यासाठी सरकार उत्तर अशा अशासकीय संघटनाच्याबरोबर भागिदारी करेल. सेवांची अति उत्तम डिलिवरी ;Delivery) आणि प्रभावी व केंद्रस्थ (Focused) कार्यान्वयनास सुनिश्चित करण्यासाठी 10 व्या योजनेमधील चालू योजनांचे 11 व्या योजनेत संशोधन (सुधारणा) करण्यात आले आणि त्यांचा 7 योजनांमध्ये समावेश करण्यात आला आहे. समावेशी विकासाप्रती असणाऱ्या प्रतिबध्दतांची पूर्तता करण्यासाठी 11 व्या योजनेत सर्व योजनांमधील कमीत कमी 10ः राशीस पूर्वोत्तर क्षेत्रासाठी निर्देशित करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त महिला, SC/ST आणि अल्पसंख्यांक समूहातील लोकांसाठी विशेष योजना देखील सुरु करण्यात येणार आहे14.

अतिरिक्त उत्पन्न निर्माणाची संभवनीयता असणाऱ्या या क्षेत्रात उच्च प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. हस्तकला क्षेत्र हे एक असे क्षेत्र आहे की, जे शताब्दीपासूनच संरक्षित, विकसित व पल्लवित भारतीय संस्कृतीला देशाबाहेर घेऊन जाऊन तिची प्रसिध्दी करण्याची संभवनीयता ठेवत आहे. हस्तशिल्प क्षेत्राच्या विकास हेतूने व्यूहरचनेची आखणी करीत असतांना पुढील मुद्दे लक्षात घेतले जावेत.

1) हस्तशिल्प उत्पादनांना सजावटी वस्तु परिहाराबाहेर काढून उपयोगी / उपयुक्तता असणाऱ्या उत्पादन परिघामध्ये घेऊन जावे. कारण फॅन्सी हस्त उत्पादनांचा बाजार हा जवळ–जवळ संतृप्त झाला आहे.

2) अशा उपयोगी उत्पादनांच्या निर्मितीवर अधिक भर दिला जावा की, ज्यांची मागणीही पुन्हा–पुन्हा येत राहते अर्थात अशा वस्तू हया उपभोग्य वस्तू आहे.

3) हस्तशिल्प वस्तूंच्यासाठी प्रभावी विपणन तंत्र विकसित करण्याची आवश्यकता आहेत. हस्तकला क्षेत्रातील वस्तू विक्रीसाठी देशभरातील शहरांत विशुध्द स्वरुपातील स्पर्धात्मकता असणारा बाजार विकसित केला जावा या बाजारामध्ये मध्यस्थांच्या सहभागास परवानगी दिली जाऊ नये. हस्तशिल्प कारागिरांच्याकडून स्वतःच आपली उत्पादने व कलांचे प्रदर्शन भरविले जावे आणि त्यांनी आपल्या उत्पादत वस्तूंची विक्रीही प्रत्यक्षपणे ग्राहकांना करावी. कारागिरांमध्ये ग्रामीण क्षेत्रातील लोकांचा देखील समावेश केला जावा.

4) राहणीमान, फॅशन्स, आवडी इत्यादीमध्ये घडून आलेल्या परिवर्तनांना अनुसरुनच हस्तकला क्षेत्रात नाविन्य आणले जावे. या क्षेत्रास नवीन दिशा व नवीन आयाम देऊन ग्रामीण व अर्धशहरी क्षेत्रात त्यास बेरोजगारी व दारिद्रय निवारण्याचे एक प्रभावी साधन बनविले जाऊ शकते. वर्तमान परिप्रेक्षात हस्तकला क्षेत्राच्या यशस्वीतेसाठी या क्षेत्रास उपयोगी वस्तू–निर्माणाच्या दिशेने वळवुन शहरी बाजारापर्यंत कारागिरांची पोहोच सुनिश्चित केली जावी15.

5) कृषी, उदयोग, संस्था, फॅशन डिझाइन्स इत्यादीमध्ये समन्वय हा सर्वांगिण स्वरुपात समानतेबरोबरच स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

6) ग्रामीण कारागिरांसाठी अधिक उत्पन्न अर्जित करण्याच्या दिशेने अशा गावांना ग्रामीण पर्यटन व पर्या–पर्यटनाच्या अहम हिस्सा स्वरुपात प्रोत्साहन दिले जावे. पर्यटनाच्या माध्यमातून हस्तकला क्षेत्रास प्रसिध्दी मिळले. यामुळे पर्यटकांमध्ये वाढ घडून येईल तसेच लोकांच्या

उत्पन्नात देखील वाढ घडून येईल.
7) हस्तशिल्प क्षेत्रातील कारागिरांना तंत्रज्ञानासंबंधीचे प्रशिक्षण आणि सरकारी योजनासंबंधीची माहिती करुन देण्यासाठी वेळोवेळी कार्यशाळांचे आयोजन देखील लाभकारक ठरु शकते.
8) हस्तकला क्षेत्राला प्रोत्साहित करण्यासाठी मिडिया संस्था उदा.जाहिरात आणि दृष्य प्रसिध्दी संचालयनाव्दारे अधिक प्रभावीरित्या प्रसिध्दी कार्यक्रम सुनिश्चित केला जावा. यामध्ये खाजगी मिडिया संस्था आणि मिडिया शिक्षण संस्थांचे सहाय्य देखील घेतले जाऊ शकते.
9) या विशेष ग्रामीण क्षेत्रांना विशेष आर्थिक क्षेत्राच्या रचनेत देखील विकसित केले जाऊ शकेल. प्रस्तावित, विशेष हस्तकला क्षेत्र किंवा विशेष कला क्षेत्र हे हस्तकलेचे प्रशिक्षण, निर्माण, उत्पादन आणि यांच्याशी जोडलेल्या पुष्कळशा व्यावसायिक कार्यक्रमांच्या बरोबरच हस्तकलेस पर्यटन गड स्वरुपात देखील स्थापित करता येईल 16.

***समारोप*** :— हस्तकला क्षेत्रात उत्पन्न निर्माणाची क्षमता आहे. या क्षेत्राकडे प्राधान्यक्रम दृष्टी ठेवुन लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या क्षेत्रातील कारागिरांच्यासाठी ज्या विविध योजना कार्यान्वित केल्या जात आहेत त्यामध्ये मूल्य श्रृंखलेवर विशेष भर दिला जावा. कारागिरांचे कौशल्य, डिझाइन्स, उत्पादन विकास, व्यापारी क्षमता, विपणन सुविधा, चल भांडवलाची आवश्यकता इत्यादीकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारागिर कल्याण योजनांना पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जावा. सरकारी कार्यक्रम हे अधिक प्रभावीपणे राबविले जावेत. या कार्यक्रमांत विविध प्रकारचे हस्तशिल्प वर्ग आणि त्यांच्या उपखंडावर लक्ष दिले जावे. या क्षेत्राला प्रोत्साहने आणि गुंतवणूकीची आवश्यकता आहे. शिल्पकारांच्या स्थायी विकासासाठी त्यांना बाजाराबाबतची उचित व स्थायी स्वरूपातील माहिती उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. जलदगतीने बदलणाऱ्या आर्थिक परिदृष्याने हस्तकला क्षेत्रातील कारागिरांच्या आरोग्य व उपजिविकेला धोका निर्माण केला आहे. सरकार आणि उदयोजकांनी उत्पादन प्रक्रियांशी संबधित धोक्यांच्या बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी एकत्रितरित्या सक्रिय स्वरूपात काम करण्याची आवश्यकता आहे. तसेच कारागिरांच्या रक्षणार्थ प्रत्येक क्षेत्रासाठी न्यूनतम पायाभूत मानके निर्धारित केली जावीत. हस्तकला क्षेत्रास कुटीरोद्योगाच्या स्वरूपात आणखीन सशक्त बनविणे ही काळाची गरज आहे.

## íReferences:

1)दास्ताने संतोष (2010), "भारत एक पाहणी" दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, पान नं. 55.
2)योजना मासिक (हिंदी) जून 2007 वर्ष—51, अंक—3, पान नं 19.
3)योजना मासिक (हिंदी), मे 2011 वर्ष —55, अंक—5, पान नं 7
4)Eleventh Five Year Plan, Government of India (2007-2012), Planning commission, Volume-III, New Delhi, Page No. 111.
5)Annual Report 2010-11, Ministry of Textiles, Government of India, New Delhi, Page No. 15.
6)योजना मासिक (हिंदी) जून 2007 पान नं 21.
7)Annual Report 2010-11 Page No. 156.
8)योजना मासिक (हिंदी) जून 2007 पान नं 21.
9)Eleventh Five Year Plan, Page No. 111
10)Tenth Five Year Plan (2002-07), Planning commission, Government of India, New Delhi, Volume –II, Page No. 720.
11)Annual Report 2010-11, Page No. 156 to 158.
12)IBID Page No. 159 to 160.
13)Eleventh Five Year Plan Page No. 112.
14)IBID
15)योजना मासिक (हिंदी) जून 2007 पान नं 24.
16)योजना मासिक (हिंदी) मे 2011 पान नं 25.

**Please cite this Article as:** *महाजन संजय बाबूराव.*, *'भारतीय हस्तकला क्षेत्राची कामगिरी* : **Indian Streams Research Journal (March ; 2012)**